जिल्हा परिषदेतील वर्ग ३ व वर्ग ४
कर्मचा-यांची सेवापुस्तके संगणकीकृत
करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१०९/आस्था-७
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४००००१.
दिनांक :- ०८ मार्च, २०१९

शासन परिपत्रक

प्रस्तावना :-

मानव संपदा धोरणाच्या अनुषंगाने राज्यातील वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचा-यांचे सेवापुस्तक संगणकीकृत करण्याचा शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला असून, त्यानुसार राज्यातील जिल्हा परिषदेच्या वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचा-यांची सेवापुस्तके संगणकीकृत करण्याची प्रक्रिया जिल्हा परिषद स्तरावर सुरू आहे. हा प्रकल्प / योजना राबवितांना मार्गदर्शक म्हणुन प्राथम्याने नागपुर/ नाशिक जिल्हा परिषदेची निवड करण्यात आली आहे. त्यानुसार या जिल्हा परिषदेकडुन सेवापुस्तके संगणकीकृत करण्याची कार्यवाही ९०% पुर्ण झाली आहे. तसेच अन्य जिल्हा परिषदांमध्ये देखील सेवापुस्तके संगणकीकृत करण्याची कार्यवाही वेगाने सुरू आहे.

शासन परिपत्रक :-

या संदर्भात आता पुढील प्रमाणे सुचना देण्यात येत आहे.

१) सेवापुस्तके संगणकीकृत करण्याची कार्यवाही पुढील ३ महिन्यात पुर्ण करण्याबाबत सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी व्यक्तिशः लक्ष द्यावे.

२) ज्या जिल्हा परिषदांची सेवापुस्तके संगणकीकृत प्रणालीवर नोंदविण्याची कार्यवाही ९०% वा त्यापेक्षा अधिक झालेली आहे, त्या जिल्हा परिषदांनी प्रचलित सेवापुस्तकामध्ये नोंदी घेण्याचे तात्काळ थांबवून या पुढील सेवापुस्कामधील सर्व नोंदी संगणकीय सेवापुस्तकात घेण्यात याव्यात. ही कार्यवाही १ एप्रिल, २०१९ पासुन सुरु करण्यात यावी.

३) अशा पध्दतीने प्रचलीत सेवापुस्तके तात्पुरत्या स्वरूपात मागे घेतली आहेत. ती सेवापुस्तके पुढील सुचना मिळेपर्यंत काळजीपुर्वक जतन करण्यात यावीत.

४) जे कर्मचारी डिसेंबर, २०१९ पर्यंत सेवानिवृत्त होत आहेत, त्यांची सेवापुस्तके संगणकीकृत करू नयेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०८१८२६२४३०२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Priyadarshan S Kamble

Digitally signed by Priyadarshan S Kamble
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f18890edb030995db4323c71a3bdecddde94daa5425bbe713b2e2a5b7d6fa779, cn=Priyadarshan S Kamble
Date: 2019.03.08 20:13:01 +05'30'

(प्रि.शं.कांबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव,मलबार हिल, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
४) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय , मुंबई
६) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व अपरमुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव,सर्व मंत्रालयीन विभाग
८) सर्व विभागीय आयुक्त
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०) उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व विभाग)
११) माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
१२) सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
१३) निवड नस्ती कार्या क्र.आस्था-७, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२